# <u>त्यांच्या शब्दांनी अमेरिका बदलली</u>



डॉ. मार्टिन ल्युथर किंग, ज्यु. हे एक पती होते आणि चार मुलांचे वडील होते. ते एक <u>धर्मगुरू</u> होते आणि एक <u>लेखकही</u> होते. ते दर रविवारी चर्चमध्ये प्रवचन देत असत. ते दररोज अनेक लोकांशी बोलत असत. ते चिडलेल्या लोकांशी बोलत. <u>तुरुंगातील</u> लोकांशी बोलत. अमेरिकेच्या <u>अध्याक्षांशीही</u> ते बोलत असत.

डॉ. किंग एकदा १९६३ साली Washington, D. C. इथे गेले होते. तिथे लिंकन मेमोरियलच्या पायऱ्यांवरून ते एका विशाल <u>जनसमुदायाशी</u> बोलले. सगळे लोक मनापासून ऐकत होते. डॉ. किंग त्यांच्या एका स्वप्नाबद्दल बोलत होते. ते म्हणाले, "माझे असे स्वप्न आहे की माझी चार मुले अशा देशात राहतील की जिथे त्यांना त्यांच्या रंगावरून नाही तर त्यांच्या <u>चारित्र्यावरून</u> ओळखले जाईल."

लोकांना डॉ. किंग यांचे स्वप्न समजले. त्यांच्या लक्षात आले की सारी माणसे <u>समान</u> आहेत. त्यांना हेही कळले की आपले स्वप्न खरे करण्यासाठी डॉ. किंग खूप काम करत आहेत.

हळूहळू जग बदलू लागले. लोकांना डॉ. किंग यांचे म्हणणे पटू लागले. ते त्यांच्याबरोबर काम करू लागले. डॉ. किंग यांच्यासमोर महात्मा गांधींचा आदर्श होता. गांधीजीप्रमाणे त्यांनी <u>अहिंसक</u> मार्गांनी वाईट <u>कायद्यांचा</u> विरोध केला.

परंतु १९६८ साली एका रागावलेल्या माणसाने डॉ. किंग यांना गोळी मारली. डॉ. किंग मरण पावले. लोकांना वाटले की डॉ. किंग यांचे स्वप्न आता त्यांच्या बरोबरच मरणार. पण लोकांना त्यांचे शब्द आठवले. त्यांच्या शब्दांनी अमेरिका बदलली. त्यांचे त्यांच्या मुलांसाठीचे स्वप्न आता खरे होत आहे.

~~~~~

~ शब्दांकन - सुजित उपाध्ये (त्रिवेणी मराठी शाळा, सिनसिनाटी, ओहायो)

Unrestricted
~~~~~

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. ही गोष्ट कोणाबद्दल आहे?

---------------------------------------------------------------------------------------------------------------

२. डॉ. किंग यांचा व्यवसाय काय होता?

---------------------------------------------------------------------------------------------------------------

३. डॉ. किंग दररोज काय करीत असत?

---------------------------------------------------------------------------------------------------------------

४. डॉ. किंग यांचे स्वप्न काय होते?

---------------------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------------------

४. डॉ. किंग आणि त्यांच्या अनुयायांनी वाईट कायद्यांचा दिरोध कसा केला?

---------------------------------------------------------------------------------------------------------------

५. डॉ. किंग यांच्या शब्दांनी अमेरिका खरच बदलली का? तुम्हाला काय वाटते?

---------------------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------------------

Unrestricted

**<u>अवघड शब्दांची ओळख</u>**

**डॉ. किंग यांचा अहिंसेवर विश्वास होता.**

**हिंसा** - बळाचा उपयोग करणे.

**अहिंसा** - बळाचा उपयोग न करणे.

खाली उदाहरणांमध्ये "हिंसा" आणि "अहिंसा" हे शब्द लिहा:

---------------------- अनिलने किरणला गुद्दा मारला.

--------------------- अमरने राजीवचे मत ऐकून घेतले. नंतर राजीवने अमरचे मत ऐकले.

---------------------- हेमा अंजलीवर चिडली होती म्हणून तिने अंजलीचे पुस्तक फाडले.

---------------------- बस घराजवळ थांबावी म्हणून मुक्ताने शाळेला पत्र लिहिले.

**डॉ. किंग यांनी अन्यायाचा विरोध केला.**

**न्याय** - बरोबर

**अन्याय** - चूक

खाली उदाहरणांमध्ये "न्याय" आणि "अन्याय" हे शब्द लिहा:

---------------------- अभयचे केस काळे होते म्हणून त्याला वर्गाचा प्रतिनिधी केले.

---------------------- संजीवने त्याचा अभ्यास लवकर संपवला म्हणून त्याला मोकळा वेळ मिळाला.

---------------------- सईच्या रस्त्यावर गरीब लोक राहायचे म्हणून त्यांचा रस्ता दुरुस्त केला गेला नाही.

---------------------- ग्रंथालयाचे पुस्तक उशीरा परत केले तर सर्वांना दंड होतो.

Unrestricted